भारतरत्न नानाजी देशमुख शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, हिंगोली येथे भारतरत्न नानाजी देशमुख यांचा पुर्णाकृती पुतळा बसविण्यासाठी आयोजित सोहळ्याच्या तयारीसाठी येणाऱ्या खर्चास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत...

महाराष्ट्र शासन
कौशल्य रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग
शासन ज्ञापन, क्रमांक: आयटीआय-२०२६/प्र.क्र.१३५/E-१९०३९३९/व्यशि-३
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक : २० नोव्हेंबर, २०२६

वाचा :- १) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, क्र.पुतळा-३११६/प्र.क्र.३०८/२९, दि.०२.०५.२०१७
२) कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, शासन निर्णय, क्र.आयटीआय-२०२४/प्र.क्र.१२४/व्यशि-३, दि.०८.१०.२०२४
३) संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांचे पत्र क्र. १४/मालमत्ता/पुणाकृती पुतळा उभारणे/प्र.क्र.८६/२०२६/३३२, दि.१६.११.२०२६

ज्ञापन :-

मा. राज्य मंत्रिमंडळाच्या दि.३०.०९.२०२४ रोजीच्या बैठकीमध्ये घेतलेल्या निर्णयानुसार, राज्यातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थांच्या नावात बदल करण्यासाठी मा. मंत्री (कौ.रो.उ. व ना.) यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यास मंजूरी देण्यात आली आहे व त्यानुषंगाने संदर्भाधीन क्र. २ येथील दि.०८.१०.२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये समिती गठीत करण्यात आली आहे. तसेच, "शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, हिंगोली" या संस्थेच्या नावाऐवजी "भारतरत्न नानाजी देशमुख शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, हिंगोली" अशा नामकरणाबाबत शासन निर्णय दि.०८.१०.२०२४ रोजी निर्गमित करण्यात करण्यात आला आहे.

२. सामान्य प्रशासन विभागाने संदर्भाधीन क्र. १ येथील दि.०२.०५.२०१७ च्या शासन निर्णयान्वये राज्यातील सार्वजनिक ठिकाणी थोर व्यक्तींचे पुतळे बसविण्याबाबत संबंधित जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली स्थायी स्वरुपात पुतळा समिती गठीत करण्यात आली आहे.

३. संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय यांची विनंती व सामान्य प्रशासन विभागाच्या संदर्भाधीन क्र. १ येथील शासन निर्णय दि. ०२.०५.२०१७ मधील तरतूदींनुसार, भारतरत्न नानाजी देशमुख शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, हिंगोली येथे भारतरत्न नानाजी देशमुख यांचा पुर्णाकृती पुतळा ज्या जागेवर बसविण्यात येणार आहे त्या जागेच्या

सुशोभिकरणासाठी (मुख्य इमारतीसमोर लॅण्डस्केपींग, मुख्य सोहळ्याच्या ठिकाणी तयारी, वृक्षारोपण) व कार्यक्रम / सोहळ्याच्या तयारीकरिता लेखाशिर्ष २२३०ए०३१ अंतर्गत १३-कार्यालयीन खर्च या उद्दिष्टाखाली अनुक्रमे रू.९,००,०००/- व रू.२५,००,०००/- अशा एकुण रू. ३४,००,०००/- (अक्षरी रुपये चौतीस लाख फक्त) इतक्या रकमेस सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

३. सदर खर्च वित्त विभागाने दिलेल्या निर्देशांनुसार तसेच वित्त विभागाने वितरीत केलेल्या निधीच्या मर्यादेत करण्यात यावा. उपरोक्त खर्चाची अनुज्ञेयता तपासण्याची जबाबदारी, संचालक व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय यांची राहील.

४. सदर ज्ञापन वित्त विभागाच्या शासन निर्णय क्रमांक : विअप्र-२०२६/प्र.क्र.२२/विवियम, दि.११.०८.२०२६ मधील वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८ नुसार व वित्त विभागाव्दारे वेळोवेळी निर्गमित निर्देशास अनुसरुन तसेच वित्त विभाग ज्ञापन दि.०९.०४.२०२६ रोजीच्या शासन परिपत्रकामधील तरतुदींचे पालन करण्याच्या अधीन राहून निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन ज्ञापन महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६११२०१८०४२४०१०३ असा आहे. हे ज्ञापन डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

BHAROSE MUNJA UMARAO

Digitally signed by BHAROSE MUNJA UMARAO
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=SEEID, 2.5.4.20=F3ABF3AB8B16DFEC487F18CE64D6B0AB8E38D8925D44D15F7DBD61BABB4AE6DF, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=88015B0D7AFAA0DB7C0603C5C954E6816492DBB5F94AB286DA7F224853A4EEBF, cn=BHAROSE MUNJA UMARAO
Date: 2026.11.20 18:05:19 +05'30'

(मुं. उ. भरोसे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :-

१. संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२. प्रधान महालेखापाल (लेखापरिक्षा-१ व २), महाराष्ट्र-१, मुंबई (संचालनालयामार्फत)
३. प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता -१ व २), महाराष्ट्र, मुंबई (संचालनालयामार्फत)
४. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई (संचालनालयामार्फत)
५. सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय, छत्रपती संभाजीनगर
६. भारतरत्न नानाजी देशमुख शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, हिंगोली
७. कक्ष अधिकारी (प्रशा-३), कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, मंत्रालय,मुंबई.
८. निवडनस्ती (व्यशि-३), कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, मंत्रालय, मुंबई.